शासकीय सेवेत मागासवर्गीय कर्मचारी/अधिकारी यांनी गा-हाणी/निवेदने यांचेवर विनाविलंब कार्यवाही करण्याबाबत, तसेच आरक्षण विषयक आदेशांची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याबाबत.

शिस्तभंग विषयक कारवाई.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक: बीसीसी-१०९३/१४०१/प्र.क्र.१२५/९३/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक २८ जुलै, १९९३.

पहा :- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:- बीसीसी-१०८६/५५३/१६-ब, दिनांक १२ ऑक्टोबर, १९९०.

**परिपत्रक** :- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०८६/५५३/१६-ब, दिनांक १२ ऑक्टोबर, १९९० अन्वये शासनाने असे आदेश निर्गमित केले आहेत की, मागासवर्गीयांच्या सेवाविषयक तक्रारी/गा-हाणी यांच्या संदर्भात मागासवर्गीय कक्षाकडून मागविण्यात आलेले अभिप्राय तातडीने व एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावेत. तसेच माहिती १ महिन्याच्या आत पाठविण्यात आली नाही तर अशा प्रकरणी शासनात गंभीर दखल घेऊन संबंधितांविरुद्ध नियमाप्रमाणे कारवाई करावी लागेल. तसेच शासनाने आरक्षण विषयक वेळोवेळी जे आदेश निर्गमित केले आहेत त्यांची काही कार्यालयांकडून नीटपणे अंमलबजावणी केली जात नाही व त्याकडे दुर्लक्ष करुन टाळाटाळ केली जाते. आरक्षण विषयक आदेशांची अंमलबजावणी करण्यात जे अधिकारी दुर्लक्ष व निष्काळजीपणा दाखवतील त्यांच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल असेही त्या आदेशात नमूद करण्यात आले आहे. तथापि ब-याच विभागात/कार्यालयात शासनाने वेळोवेळी जे आरक्षणविषयक आदेश निर्गमित केले आहेत त्यांची अंमलबजावणी होत नसल्याचे आढळून आले आहे. या संदर्भात जुलै, १९९३ च्या अधिवेशनामध्ये विधानपरिषदेमध्ये चर्चा झाली होती व या चर्चेत मा. सभासदांनी आरक्षण-विषयक धोरणाचे पालन न करणा-या अधिका-यांविरुद्ध/कर्मचा-यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्या चर्चेच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना याबाबत पुन: एकदा सूचना देण्यात येत आहेत की, जे अधिकारी सेवा विषयक बाबींच्या आदेशांच्या अंमलबजावणी संदर्भात दुर्लक्ष किंवा निष्काळजीपणा दाखवतील असे संबंधित अधिकारी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील. सक्षम अधिका-याने शासकीय आदेशाप्रमाणे कार्यवाही न करणा-या त्यांच्या नियंत्रणा-खालील अधिका-यांविरुद्ध नियमाप्रमाणे शिस्तभंग विषयक कारवाई सुरु करावी व त्यांची माहिती सामान्य प्रशासन विभागाला कळवावी.

सर्व मंत्रालयीन विभाग/विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी वरील आदेशांची योग्य ती नोंद घेऊन त्याचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी. तसेच सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील शासकीय कार्यालये, उपक्रम, मंडळे, महामंडळे, सहकारी संस्था, इत्यादींच्या निदर्शनास वरील आदेश आणावेत व त्यांचे

....२